वाहतुक शाखा, पुणे शहर
पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./६६६४ /२०२३ दिनांक :-१६/ ९/२०२३

-: प्रसिध्दीपत्रक :-

**अथर्वशीर्ष पठणानिमित्त वाहतूक व्यवस्थेत करण्यात आलेल्या बदलाबावत..**

दिनांक २०/०९/२०२३ रोजी पहाटे ०५.०० वाजेपासून श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंडळाच्या समोर श्रीमंत दगडूशेठ हलवाई गपणती मंडळ यांच्या संयोजनाखाली अथर्वशीर्ष पठणाचा धार्मिक कार्यक्रम होत आहे त्या कार्यक्रमासाठी हजारो महिला भाविक सहभागी होत असतात त्याकरीता सदर कार्यक्रम दरम्यान वाहतूकीची कोंडी टाळणेसाठी व वाहतूक सुरळीत सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन दिनांक २०/०९/२०२३ रोजी पहाटे ०५.०० वाजे पासून ते अथर्वशीर्ष पठणाचा धार्मिक कार्यक्रम संपेपर्यत वाहतुकीचे बदलाबाबत खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**अ) वाहतूक व्यवस्था :-**

- खालील नमूद रस्त्यांवर सर्व प्रकारची वाहने जाणे-येणेसाठी बंद करणेत येत आहे.
  १. **शिवाजी रोड : जिजामाता चौक ते रामेश्वर मंदिर चौक**
  **पर्यायी मार्ग-** गाडगीळ पुतळा-जिजामाताचौक डावीकडे वळून गणेश रोडने फडके हौदचौक,देवजीबाबा चौक उजवीकडे वळून हमजेखान चौक सरळ महाराणाप्रताप मार्गावरुन गोविंद हलवाई चौक उजवीकडे वळून गोटीराम भैया चौक डवीकडे वळून शिवाजीरोडने स्वारगेटकडे

  २. **आप्पा बळवंत चौक ते बुधवार चौक**
  **पर्यायी मार्ग-** अप्पा बळवंत चौक बाजीराव रोडने फुटका बुरूज मार्गे गाडगीळ पुतळा चौक उजवीकडे वळून जिजामाता चौक नंतर वरीलप्रमाणे.

- **लक्ष्मीरोडवर विजय मारुती चौक / सोन्या मारुती चौकापासून आवश्यकतेनुसार वाहतूक वळविली जाईल.**
  **पर्यायी मार्ग-** सोन्यामारुती चौक डावीकडे वळुन मिर्जा गालीब रोड जंक्शन उजवीकडे वळुन मंडई डावीकडे वळून शिवाजी रोडने स्वारगेट

तरी वाहनचालकांनी वरील प्रमाणे करण्यात आलेल्या वाहतुक बदलांचा अवलंब करून गणेशोत्सव शांततेने पार पाडण्यास व वाहतुक सुरळीत ठेवण्यास पुणे शहर वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे. असे आवाहन वाहतूक शाखेमार्फत करण्यात येत आहे.

16/9/2023

( विजयकुमार मगर )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रत** :- १.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी
२.सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३ वाहतुक शाखा पुणे शहर
३.सर्व प्रभारी अधिकारी, वाहतुक शाखा पुणे शहर

प्रत
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा-१ पुणे शहर